हातमाग कापड स्पर्धा व बक्षिस योजनेसाठी
सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील निधी
वितरीत करणेबाबत....

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः हातमाग-२०१८/६२०/प्र.क्र.३०/टेक्स-३

१४ वा मजला, नविन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख : २६ मार्च, २०१८

वाचा :

१) शासन निर्णय, कृषि व सहकार विभाग क्र. सीटीएस-१०७२/ ३७९५/ सी २(१), दिनांक ५.१०.१९७२.
२) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. हातमाग-२००८/प्र.क्र.९७/टेक्स-३, दिनांक २९ सप्टेंबर, २००८.
३) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. हातमाग-२०१५/प्र.क्र.१४७/टेक्स-३, दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ व शासन शुध्दीपत्रक, दिनांक १८.१.२०१७
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७.
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा-५, दिनांक १०.५.२०१६.
६) संचालक वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर यांचे पत्र क्र. कार्या-५/बक्षिस योजना/ तरतूद/९९०८/२०१७, दिनांक ०७ डिसेंबर, २०१७

प्रस्तावना :

राज्यातील हातमाग व्यवसायातील समस्यांचा अभ्यास करून त्या सोडविण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी मा. श्री. तिडके, विधानसभा सदस्य यांचे अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या शिफारशीनुसार हातमाग विणकरांना प्रोत्साहन देण्यासाठी पारंपारिक व अपारंपारिक डिझाईनच्या अत्युत्कृष्ट कापड उत्पादन करणा-या विणकरांसाठी विविध स्तरावर स्पर्धा आयोजित करून बक्षिस देण्याची योजना संदर्भाधिन क्र. १ येथ नमूद दिनांक ५.१०.१९७२ च्या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आली आहे. दिनांक ५.१०.१९७२ च्या शासन निर्णयाद्वारे सुरू करण्यात आलेल्या योजनेत वर नमूद दिनांक २९ सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयाद्वारे बक्षीसाच्या रकमेत वाढ करण्यात आली. सन २०१५-१६ ह्या वर्षापर्यंत वर नमूद दिनांक २९ सप्टेंबर, २००८ च्या शासन निर्णयात नमूद बक्षिसाच्या दराने हातमाग विणकरांसाठी उत्कृष्ट कापड उत्पादन स्पर्धा ही योजना राबविण्यात येत होती. दरम्यान हातमाग विणकरांच्या संख्येत झालेली घट, अनुसूचित जातीचे विणकर स्पर्धेसाठी उपलब्ध न होणे, बक्षिसाच्या रक्कमेत वाढ करण्याची विणकरांची मागणी, आयोजनाच्या खर्चात झालेली वाढ इत्यादी बाबी विचारात घेवून वर नमूद दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन

निर्णयान्वये बक्षिस योजनेची पुनर्रचना करण्यात आली आहे. सन २०१७-१८ मध्ये बक्षिस योजना राबविण्याकरीता अर्थसंकल्पिय तरतूदीतून निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव वस्त्रोद्योग संचालनलयाच्या वर नमूद दिनांक ०७ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये प्राप्त झाला आहे. त्यानुसार सदर योजनेसाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :

"मागणी क्रमांक व्ही-२, लेखाशिर्ष-२८५१ ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११० संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, (११०) (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०२)(५०) हातमाग उद्योगाच्या विकासाकरीता सूट व इतर अर्थसहाय्य (२८५१०११९) ०५, बक्षिसे" या लेखाशिर्षाखाली रु. ४,५०,०००/- (रु. चार लाख पन्नास हजार फक्त) इतकी रक्कम सन २०१७-१८ साठी मंजूर निधीतून वितरीत करून खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर योजनेंतर्गत या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेला रु. ४.५० लाख इतका निधी विणकरांच्या स्पर्धेच्या आयोजनासाठी व बक्षिस वितरणासाठी वितरीत करण्यासाठी सहायक संचालक (लेखा), वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना या योजनेसाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर रक्कम ज्या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात येत आहे, त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावी.

४. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद क्र. ७ (क) नुसार एखादी योजना/प्रकल्पाच्या खर्चाच्या बाबीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असेल. तसेच खर्चासाठी तरतूद उपलब्ध असेल व खर्च मंजूरीचे विभागास वित्तीय अधिकार असल्यास निधी वितरणासाठी वित्त विभागाची सहमतीची आवश्यकता नाही. सदर योजनेस वर नमूद दिनांक ५.१०.१९७२ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.

५. या योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये रू. ४,५०,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आला असून त्या सर्व रकमेची विनियोग प्रमाणपत्र वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर यांच्याकडून दिनांक ३ मार्च, २०१८ च्या पत्रान्वये प्राप्त झाली आहेत. सन २०१७-१८ मध्ये ह्या योजनेंतर्गत अद्याप कोणताही निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

६. या योजनेच्या लेखाशीर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

७. वैयक्तिक लाभार्थ्याची देयके आहरीत करतांना लाभार्थ्यांची यादी निश्चित करून योग्य त्या तपशिलासह देयकासोबत जोडल्याशिवाय वैयक्तिक लाभार्थ्यांची अनुदाने आहरीत करण्यात येवू नयेत. शक्यतो अश्या लाभार्थ्यांचे आधार क्रमांक पण नमूद करावेत.

८. या योजनेच्या निधी खर्च करतांना वित्तीय अधिकार नियमपुस्तिकेत नमूद वित्तीय अधिकारांचे पालन करण्यात यावे. तसेच यासंबंधी शासनाच्या मार्गदर्शक सूचना व नियमांचे पालन कटाक्षाने करण्यात यावे.

९. हातमाग उद्योगाच्या विकासाकरीता सूट व इतर अर्थसहाय्य ह्या योजनेच्या ५, बक्षिसे ह्या बाबीखाली सन २०१७-१८ साठी रु. ४.५० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला असून सुधारीत अंदाजातदेखील रु. ४.५० लाख इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

१०. स्पर्धेअंती विजेत्या हातमाग विणकरांना द्यावयाची बक्षिसे तसेच आयोजनाकरीता करण्यात येणा-या खर्चाची देयके संबंधितांच्या बँक खात्यात ECS द्वारे थेट जमा करण्यात यावी.

११. यावरील खर्च " मागणी क्रमांक व्ही-२, लेखाशिर्ष-२८५१ ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११० संमिश्र ग्रामोद्योग व लघुउद्योग आणि सहकारी संस्था, (११०) (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०२) (५०) हातमाग उद्योगाच्या विकासाकरीता सूट व इतर अर्थसहाय्य (२८५१०११९) ०५, बक्षिसे" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करीता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१२. संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर निधीचे विनियोग प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

१३. सदर शासन निर्णय शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१०२९०३०३०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pramod D. Tupe

Digitally signed by Pramod D. Tupe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Op, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=28590802f030b209e5b1d488527383f61acb2a10c00b8e9718dcbbc845a30f9b, cn=Pramod D. Tupe
Date: 2018.03.28 10:30:37 +05'30'

(प्रमोद द. तुपे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर
२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
३. संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहायक, सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अवर सचिव (१७-स), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
६. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
७. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय मुंबई
८. प्रादेशिक उपसंचालक (वस्त्रोद्योग), मुंबई / नागपूर / औरंगाबाद / सोलापूर.
९. निवड नस्ती टेक्स-३.